# 'महात्मा'पर्यंतचा प्रवास उलगडला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात 'गांधी इन साऊथ आफ्रिका' या छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाची सुरुवात झाली. महात्मा गांधी जयंतीनिमित्त या छायाचित्र प्रदर्शनाची सुरुवात झाली. येत्या ९ ऑक्टोबरपर्यंत प्रदर्शन पाहण्यासाठी खुले राहणार आहे. शुक्रवारी प्रदर्शन पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीतील आबालाल रेहमान आर्ट गॅलरीमध्ये गांधी अभ्यास केंद्र व ग्रंथालय यांच्यातर्फे प्रदर्शन आयोजित केले आहे. बीसीयूडी संचालक डॉ. डी. के. मोरे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उदघाटन झाले. डॉ. मोरे म्हणाले, 'दक्षिण आफ्रिकेतील गांधी' या दुर्मिळ छायाचित्र आणि ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या व्यक्तिमत्त्वाचा महात्मा गांधी होण्यापर्यंतच्या प्रक्रियेचा वेध घेता येऊ शकतो. विद्यापीठाच्या बॅ. खर्डेकर ग्रंथालयातील महात्मा गांधी यांच्यासंदर्भातील सुमारे १०० निवडक ग्रंथही प्रदर्शित केले आहेत. येत्या ९ ऑक्टोबरपर्यंत सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा या कालावधीत प्रदर्शन सुरू राहणार आहे.

